सकाळ



कोल्हापूर : मुंबई विद्यापीठाच्या प्रभारी कुलगुरू पदाचा कार्यभार डॉ. डी. टी. शिर्के यांनी प्रा. डॉ. सुहास पेडणेकर यांच्याकडून शनिवारी स्वीकारला.

# डॉ. शिर्के यांच्याकडे मुंबई विद्यापीठाचा कार्यभार

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १० : शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के यांनी आज मुंबई विद्यापीठाच्या कुलगुरू पदाचा अतिरिक्त कार्यभार स्वीकारला. मावळते कुलगुरू प्रा. सुहास पेडणेकर यांनी प्रा. शिर्के यांना कुलगुरू पदाचा कार्यभार सोपविला.

फोर्ट संकुलातील व्यवस्थापन परिषदेच्या दालनात आयोजित कार्यक्रमामध्ये उपस्थितांना संबोधित करताना कुलगुरू प्रा. शिर्के म्हणाले, ''मुंबई विद्यापीठ हे देशातील अग्रगण्य विद्यापीठ असून, या विद्यापीठाची धुरा आपल्या खांद्यावर सोपविल्याबाबत त्यांनी राज्यपाल तथा कुलपती भगतसिंह कोश्यारी यांचे आभार मानतो. मुंबई विद्यापीठाने ज्ञानदानाचा ऐतिहासिक वारसा आणि समृद्ध परंपरा अविरतपणे जोपासली आहे. ही प्रक्रिया निरंतर ठेवण्यासाठी सर्वांचे सहकार्य अपेक्षित असून त्यासाठी सर्वच स्तरातून प्रयत्न होणे गरजेचे आहे. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करणे, विविध प्राधिकरणांच्या निवडणुका, परीक्षा पद्धती आणि कोविडमुळे प्रभावित झालेले ॲकॅडमिक कॅलेंडर पुन्हा नियमित करण्याची प्राथमिकता आहे.'' मावळते प्र-कुलगुरू प्रा. रवींद्र कुलकर्णी, प्रभारी कुलसचिव प्रा. शैलेंद्र देवळाणकर, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता प्राचार्य डॉ. अजय भामरे, मानव्य विद्याशाखेचे अधिष्ठाता प्रा. राजेश खरात, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेच्या अधिष्ठाता डॉ. अनुराधा मजूमदार, वित्त व लेखा अधिकारी प्रा. (सीए.) प्रदीप कामथेकर यांच्यासह विविध महाविद्यालयाचे प्राचार्य, संचालक, विभागप्रमुख, शिक्षक आणि शिक्षकेतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

पुण्यनगरी



मुंबई : शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी शनिवारी मुंबई विद्यापीठाच्या कुलगुरूपदाचा अतिरिक्त कार्यभार स्वीकारला. मावळते कुलगुरू प्रा. सुहास पेडणेकर यांनी कार्यभार सोपवला.

# डॉ. शिर्के यांनी मुंबई विद्यापीठाच्या कुलगुरूपदाचा कार्यभार स्वीकारला

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठ कोल्हापूरचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी शनिवारी मुंबई विद्यापीठाच्या कुलगुरूपदाचा अतिरिक्त कार्यभार स्वीकारला. मावळते कुलगुरू प्रा. सुहास पेडणेकर यांनी डॉ. शिर्के यांना कुलगुरूपदाचा कार्यभार सोपवला. विद्यापीठातील फोर्ट संकुलातील व्यवस्थापन परिषदेच्या दालनात हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

यावेळी कुलगुरू प्रा. दिगंबर शिर्के म्हणाले, मुंबई विद्यापीठ हे देशातील अग्रगण्य विद्यापीठ आहे. या विद्यापीठाची धुरा आपल्या खांद्यावर सोपविल्याबाबत राज्यपाल तथा कुलपती भगतसिंह कोश्यारी यांचा आभारी आहे. मुंबई विद्यापीठाने ज्ञानदानाचा ऐतिहासिक वारसा आणि समृद्ध परंपरा अविरतपणे जोपासली आहे. ही प्रक्रिया निरंतर ठेवण्यासाठी सर्वांचे सहकार्य अपेक्षित असून, त्यासाठी सर्वच स्तरातून प्रयत्न होणे गरजेचे आहे. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करणे, विविध प्राधिकरणांच्या निवडणुका, परीक्षा पद्धती आणि कोविडच्या प्रभावामुळे प्रभावित झालेले ॲकेडमिक कॅलेंडर ही प्राथमिकता आहे.

याप्रसंगी मावळते प्र-कुलगुरू प्रा. रवींद्र कुलकर्णी, प्रभारी कुलसचिव प्रा. शैलेंद्र देवळाणकर, वाणिज्य व व्यवस्थापन विद्या शाखेचे अधिष्ठाता प्राचार्य डॉ. अजय भामरे, मानव्य विद्याशाखेचे अधिष्ठाता प्रा. राजेश खरात, विज्ञान व तंत्रज्ञान विद्या शाखेच्या अधिष्ठाता डॉ. अनुराधा मजुमदार, वित्त व लेखा अधिकारी प्रा. प्रदीप कामथेकर आदी उपस्थित होते.

लोकमत



शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी मुंबई विद्यापीठाचा प्रभारी कुलगुरूपदाचा प्रभार मुंबई विद्यापीठाचे मावळते कुलगुरू डॉ. सुहास पेडणेकर यांच्याकडून शनिवारी स्वीकारला.

# कुलगुरू शिर्केंनी स्वीकारला मुंबई विद्यापीठाचा कार्यभार

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांची मुंबई विद्यापीठाच्या प्रभारी कुलगुरूपदी नियुक्ती झाली आहे. त्यांनी शनिवारी पदभार स्वीकारला.

या पदाचा कार्यभार त्यांच्यावर राज्यपाल तथा कुलपती भगतसिंह कोश्यारी यांनी शुक्रवारी सोपविला. मुंबई विद्यापीठाचे सुहास पेडणेकर यांचा कुलगुरूपदाचा कार्यकाल शनिवारी संपला. शिर्केना याबाबतचे पत्र शुक्रवारी कुलपती कार्यालयाकडून प्राप्त झाले. त्यांनी आतापर्यंत प्रभारी कुलसचिव, प्र-कुलगुरूपदी आणि शासनाच्या विविध समित्या, विद्यापीठाच्या विविध अधिकार मंडळांमध्ये काम केले आहे. त्यांना पहिल्यांदाच मुंबई विद्यापीठाच्या प्रभारी कुलगुरूपदी काम करण्याची संधी मिळाली आहे. त्यांनी डॉ. पेडणेकर यांच्याकडून शनिवारी सकाळी स्वीकारला.

> मुंबई विद्यापीठाच्या प्रभारी कुलगुरूपदी काम करण्याची संधी मिळाल्याचा आनंद आहे. ही संधी देऊन कुलपतींनी शिवाजी विद्यापीठाचा सन्मान केला आहे.
>
> - कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के

तरूण भारत

# मुंबई विद्यापीठ कुलगुरूपदाचा कार्यभार डॉ. डी. टी. शिर्के यांच्याकडे

**कोल्हापूर :** मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुहास पेडणेकर यांचा कार्यकाल संपला आहे. त्यामुळे शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्याकडे मुंबई विद्यापीठाच्या कुलगुरूपदाचा अतिरिक्त कार्यभार सोपवला आहे. शनिवारी डॉ. शिर्के यांनी मुंबई विद्यापीठाच्या कुलगुरूपदाची सुत्रे स्वीकारली.

शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यापीठातील ४८ संशोधकांचा जागतिक क्रमवारीत समावेश झाला आहे. डॉ. शिर्के यांना तब्बल ३५ वर्षाचा प्रशासकीय कामाचा अनुभव आहे. ते संख्याशास्त्र विषयाच्या संशोधनात जागतिक पातळीवरील राज्यातील एकमेव शास्त्रज्ञ आहेत.

## डॉ. शिर्के यांनी शनिवारी कार्यभार स्वीकारला



राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी डॉ. शिर्के यांच्याकडे मुंबई विद्यापीठाच्या कुलगुरूपदाचा कार्यभार सोपवला आहे. फोर्ट संकुलातील व्यवस्थापन परिषदेच्या दालनातील आयोजित कार्यक्रमावेळी प्र-कुलगुरू डॉ. रवींद्र कुलकर्णी, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता प्राचार्य डॉ. अजय भामरे, डॉ. राजेश खरात, डॉ. प्रदीप कामथेकर आदी उपस्थित होते.

Times of India

# SUK VC Shirke takes additional charge of MU

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** Shivaji University Kolhapur vice-chancellor Dr Digambar T Shirke has been given additional charge of Mumbai University.

The selection was announced by Governor of Maharashtra Dr Bhagat Singh Koshyari on Friday. Dr Shirke took the additional charge of Mumbai University on Saturday.

Shirke said "Mumbai University is the leading university of the country and I am thankful to Governor and Chancellor Bhagat Singh Koshyari for giving me this opportunity. The University of Mumbai has continuously nurtured the historical legacy and rich tradition of enlightenment. To continue this process, everyone's cooperation is expected and for this it is necessary to make efforts from all levels."

Shirke is the 13th vice-chancellor of SUK.

पुढारी

# मुंबई विद्यापीठाच्या प्रभारी कुलगुरुपदी डॉ. डी. टी. शिर्के

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी शनिवारी (दि. १०) मुंबई विद्यापीठाच्या कुलगुरुपदाचा अतिरिक्त कार्यभार स्वीकारला. मावळते कुलगुरू प्रा. सुहास पेडणेकर यांनी प्रा. शिर्के यांच्याकडे कार्यभार सोपविला. डॉ. देवानंद शिंदे यांच्यानंतर मुंबई विद्यापीठाच्या कुलगुरुपदाचा अतिरिक्त कार्यभार स्वीकारणारे डॉ. शिर्के हे दुसरे कुलगुरू आहेत.

पेडणेकर यांचा कुलगुरुपदाचा कार्यकाळ १० सप्टेंबर रोजी संपला. त्यानंतर राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी हा अतिरिक्त कार्यभार डॉ. शिर्के यांच्याकडे सोपविण्याचा निर्णय घेतला.

मुंबई विद्यापीठाच्या फोर्ट संकुलातील पान ७ वर ▸

# मुंबई विद्यापीठाच्या प्रभारी कुलगुरूपदी डॉ. डी. टी. शिर्के



कोल्हापूर : मुंबई विद्यापीठाच्या कुलगुरूपदाचा अतिरिक्त कार्यभार मावळते कुलगुरू प्रा. सुहास पेडणेकर यांच्याकडून स्वीकारताना शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. सोबत प्रभारी कुलसचिव प्रा. शैलेंद्र देवळाणकर, प्राचार्य डॉ. अजय भामरे, मावळते प्र-कुलगुरू प्रा. रवींद्र कुलकर्णी आदी. (छाया : नाज ट्रेनर)

(पान १ वरून) व्यवस्थापन परिषदेच्या दालनात पदभार स्वीकारण्याचा कार्यक्रम झाला. यावेळी बोलताना डॉ. शिर्के यांनी मुंबई विद्यापीठाने ज्ञानदानाचा ऐतिहासिक वारसा आणि समृद्ध परंपरा अविरतपणे जोपासली आहे. ही प्रक्रिया निरंतर ठेवण्यासाठी सर्वांचे सहकार्य अपेक्षित असल्याचे सांगून, डॉ. शिर्के यांनी नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करणे, विविध प्राधिकरणांच्या निवडणुका घेणे व शैक्षणिक कॅलेंडर पूर्ववत करणे ही आपली प्राथमिकता असेल, असे सांगितले.

**कोल्हापूरच्या सुपुत्राचा सन्मान**

कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के हातकणंगले तालुक्यातील वाठारचे आहेत. ३५ वर्षे अध्यापन व संशोधन क्षेत्रात ते कार्यरत आहेत. शिवाजी विद्यापीठात संख्याशास्त्र विभागात प्राध्यापक, विभागप्रमुख म्हणून त्यांनी काम पाहिले आहे. जगभरातील महत्त्वाच्या संख्याशास्त्रज्ञांमध्ये त्यांचा समावेश आहे. डॉ. शिर्के यांनी यापूर्वी शिवाजी विद्यापीठात प्रभारी कुलसचिव, प्र-कुलगुरू म्हणून काम पाहिले आहे. तसेच विविध अधिकार मंडळांवर महत्त्वाची पदे भूषविली आहेत. नवीन विद्यापीठ कायदा अस्तित्वात आल्यानंतर त्यांनी शिवाजी विद्यापीठात ऑफिसर ऑन स्पेशल ड्युटी म्हणून काम केले. ऑक्टोबर २०२० मध्ये शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरुपदी त्यांची नियुक्ती झाली.

> मुंबई विद्यापीठाच्या कुलगुरुपदाचा अतिरिक्त कार्यभार मिळणे, हा आपल्यासाठी सुखद धक्का आहे. तसेच हा शिवाजी विद्यापीठ आणि तेथील सर्व घटकांचा सन्मान आहे. कुलपती भगतसिंह कोश्यारी यांनी सोपविलेली जबाबदारी सार्थ ठरविण्याचा प्रयत्न राहील.
>
> **- डॉ. डी. टी. शिर्के,**
> कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

11 SEP 2022

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाचा अभ्यास

# विसर्जन मिरवणुकीदरम्यान दुप्पट ध्वनिप्रदूषण

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : यंदाच्या शुक्रवारी रात्रभर व शनिवारी दुपारपर्यंत झालेल्या विसर्जन मिरवणुकीत ध्वनी यंत्रणेचा दणदणाट वाढल्याने साऱ्या शहरभर मर्यादेच्या जवळपास दुप्पट ध्वनिप्रदूषण झाल्याचे शिवाजी विद्यापीठाने केलेल्या अभ्यासातून स्पष्ट झाले. विद्यापीठाने चार क्षेत्रांतील २२ ठिकाणांच्या आवाजाची पातळी ध्वनी मापन यंत्रणेद्वारे घेऊन ही पातळी निश्चित करण्यात आली. त्यामध्ये मिरजकर तिकटी, बिनखांबी गणेश मंदिर, महाद्वार रोड आणि पापाची तिकटीला आवाजाचा काटा किर्रर्र झाल्याचेच हा अभ्यास सांगतो.

विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र विभागाच्या सहायक प्रोफेसर डॉ. आसावरी जाधव, डॉ. पी. डी. राऊत, संशोधक विद्यार्थी चेतन भोसले, हर्षद मालवेकर आणि मुकुंद सुतार यांनी या प्रक्रियेत भाग घेतला. यंदा राज्य सरकारनेच रात्री बारा वाजेपर्यंत ध्वनी यंत्रणेवरील निर्बंध उठविले होते. त्यामुळे ध्वनी प्रदूषण होणारच होते त्यावर या अभ्यासातून शिक्कामोर्तब झाले.

## शांतता क्षेत्र

किमान ध्वनिपातळी : ४०
(रात्री दहा ते सकाळी ६)

प्रत्यक्षात ध्वनी पातळी

- सीपीआर : ७०.१०
- जिल्हाधिकारी कार्यालय : ६८.५०
- जिल्हा न्यायालय : ७२.००
- शिवाजी विद्यापीठ : ५०.६०

## व्यापारी क्षेत्र

किमान ध्वनी पातळी ५५
(रात्री दहा ते सकाळी ६)

प्रत्यक्षात ध्वनी पातळी

- लक्ष्मीपुरी : ७४.१०
- बिंदू चौक : ७४.९०
- मिरजकर तिकटी : ८०.४६
- बिनखांबी गणेश मंदिर : ८१.५२
- महाद्वार रोड : ८२.१५
- गुजरी : ७९.००
- पापाची तिकटी : ८५.५०
- गंगावेश : ८२.३०
- शाहूपुरी : ६७.८०
- राजारामपुरी सहावी गल्ली : ७०.००

## निवासी क्षेत्र

किमान ध्वनी पातळी ४५
(रात्री दहा ते सकाळी ६)

प्रत्यक्षात ध्वनी पातळी

- शिवाजी पेठ : ७०.११
- मंगळवार पेठ : ७८.३०
- उत्तरेश्वर पेठ : ७६.००
- राजारामपुरी पाचवी गल्ली : ६४.२०
- नागाळा पार्क :५४.५०
- ताराबाई पार्क : ६६.१०

## उद्यमनगर राहिले शांत

कोल्हापुरातील अन्य भागात वाद्यांचा दणदणाट सुरू असताना शिवाजी उद्यमनगर व वाय. पी. पोवारनगर मात्र तुलनेत शांत राहिले.

महासत्ता

# मुंबई विद्यापीठाच्या प्रभारी कुलगुरूपदी डॉ. दिगंबर शिर्के

कोल्हापूर, ता. १० (प्रतिनिधी) -

शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू



डॉ. दिगंबर शिर्के यांची मुंबई विद्यापीठाच्या प्रभारी कुलगुरूपदी कुलपती भगतसिंह कोश्यारी यांनी निवड जाहीर केली.

डॉ. शिर्के यांना गेल्या ३५ वर्षांचा शैक्षणिक, संशोधकीय आणि प्रशासकीय अनुभव आहे. त्यांनी विद्यापीठाशी निगडित सर्व अधिकार मंडळांसह कुलसचिव, प्र-कुलगुरू पदे भूषविली आहेत. या निवडीबद्दल डॉ. शिर्के यांनी, कुलपती श्री. कोश्यारी यांचे आभार मानले असून कुलपतींनी केलेली निवड सार्थ करण्याचा प्रयत्न राहील. त्याचप्रमाणे या कामगिरीला न्याय देण्यासाठी आपण या कार्यकाळात प्रयत्न करू, अशी प्रतिक्रिया व्यक्त केली.

11 SEP 2022 पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ध्वनी प्रदूषणाने पातळी ओलांडली

## दोन वर्षांनी सायलेंट झोनसह निवासी, व्यावसायिक ठिकाणीही दणदणाट

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

गणेश विसर्जन मिरवणुकीत कमालीचा उत्साह पाहायला मिळाला. आवाजाच्या दणदणाटामुळे गेल्या दोन वर्षांच्या तुलनेत ध्वनी प्रदूषणात कमालीची वाढ झाली आहे. सायलेंट झोनसह निवासी आणि व्यावसायिक अशा सर्वच ठिकाणी आवाजाच्या पातळीत वाढ झाल्याची माहिती शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरण अधिविभागाच्या अहवालातून समोर आली आहे.

पापाची तिकटी परिसरात रात्री १० ते सकाळी ६ या वेळेत आवाजाची ८५.५० डेसिबल इतकी सर्वाधिक पातळी नोंदवली गेली. याशिवाय महाद्वार रोड, गंगावेश याठिकाणी देखील आवाजाची पातळी ८२ डेसिबल पेक्षा अधिक होती. ५५ डेसिबलच्या पुढील आवाजाची पातळी प्रदूषणासाठी मोजली जाते.

> गेल्या दोन वर्षांतील गणेश विसर्जन मिरवणुकांच्या तुलनेत यंदा ध्वनी प्रदूषणाने मर्यादा ओलांडली. मंडळांकडून लावण्यात आलेल्या साऊंड सिस्टीमच्या दणदणाटामुळे ध्वनी प्रदूषणात कमालीची वाढ पाहायला मिळाली.
>
> **- डॉ. आसावरी जाधव,**
> पर्यावरण विभागप्रमुख, शिवाजी विद्यापीठ

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही कोल्हापूर शहराच्या विविध विभागांत आवाजाच्या पातळीचे मापन करण्यात आले होते. त्यामध्ये सायलेंट झोन, निवासी आणि व्यावसायिक अशा क्षेत्रांमधील २२ ठिकाणांचे सर्वेक्षण करण्यात आले. यावेळी सर्वच ठिकाणी ध्वनी प्रदूषणाची पातळी मर्यादेपेक्षा अधिकच उंचावलेली दिसून आली. केवळ औद्योगिक परिसरातच आवाजाची पातळी निश्चित मानकाच्या आत होती.

**सायलेंट झोनमध्येही गोंगाट**

सायलेंट झोन असलेल्या सीपीआर, जिल्हाधिकारी कार्यालय, न्यायालय परिसर व शिवाजी विद्यापीठ परिसरामध्ये देखील ध्वनी प्रदूषणामध्ये वाढ पाहायला मिळाली. सीपीआर व न्यायालय परिसरामध्ये आवाजाची पातळी तब्बल ७० डेसिबलपर्यंत नोंदवली गेली.

| ठिकाण | झोन | आवाजाची पातळी (डेसिबल मध्ये) | ठिकाण | झोन | आवाजाची पातळी (डेसिबल मध्ये) |
|---|---|---|---|---|---|
| सीपीआर | सायलेंट | ७०.१० | जिल्हाधिकारी कार्यालय | सायलेंट | ६८.५० |
| न्यायालय परिसर | सायलेंट | ७२ | शिवाजी विद्यापीठ | सायलेंट | ५०.६० |
| शिवाजी पेठ | निवासी | ७०.११ | मंगळवार पेठ | निवासी | ७८.३० |
| उत्तरेश्वर पेठ | निवासी | ७६ | ताराबाई पार्क | निवासी | ६६.१० |
| नागाळा पार्क | निवासी | ५४.५० | राजारामपुरी ५ वी गल्ली | निवासी | ६४.२० |
| लक्ष्मीपुरी | व्यावसायिक | ७४.१० | बिंदू चौक | व्यावसायिक | ७४.९० |
| मिरजकर तिकटी | व्यावसायिक | ८०.४६ | बिनखांबी | व्यावसायिक | ८१.५२ |
| महाद्वार रोड | व्यावसायिक | ८२.१५ | गुजरी | व्यावसायिक | ७९ |
| पापाची तिकटी | व्यावसायिक | ८५.५० | राजारामपुरी ६ वी गल्ली | व्यावसायिक | ७० |
| शाहुपूरी | व्यावसायिक | ६७.८० | गंगावेश | व्यावसायिक | ८२.३० |

11 SEP 2022

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# जल प्रदूषणाबाबतीत कमावले, ध्वनी प्रदूषणाचे काय..

## साऊंड सिस्टीमने मोडले आवाज मर्यादेचे निकष : पापाची तिकटी येथे सर्वाधिक ८६ डेसिबलचा धडाका

**कोल्हापूर : चंद्रकांत पाटील**

जिल्ह्यात शुक्रवारी दिवस-रात्र सार्वजनिक गणेशोत्सव तरुण मंडळांनी आपल्या लाडक्या बाप्पाला अतिशय भक्तिमय वातावरणात निरोप दिला. पंचगंगा नदीत मूर्ती विसर्जन न करता इराणी खाणीत विसर्जन करून जल प्रदूषणमुक्तीचे पाऊल उचलले. पुरोगामी कोल्हापूरला हे जरी भूषणावह असले तरी शिवाजी विद्यापीठाने मिरवणूक मार्गावरील आवाजाचे मोजमाप दिल्यानंतर गतवर्षीच्या तुलनेत या वर्षी फार मोठ्या प्रमाणात ध्वनी प्रदूषण झाल्याचे समोर आले आहे. त्यामुळे जल प्रदूषणाबाबतीत आपण कमावले असले तरी ध्वनी प्रदूषणाने मात्र ते गमावल्याची खंत निश्चितच आहे.

या वर्षीच्या घरगुती गणेश विसर्जनात कोल्हापूरकरांची एकता आणि शाहू महाराजांची शिकवण दिसून आली. लाखो मूर्तींचे पंचगंगेत होणारे विसर्जन जिल्हाधिकारी राहुल रेखावार यांच्या आवाहनानंतर झाले नाही. त्यामुळे बाप्पाच्या आशीर्वादाने पंचगंगाही खळखळाट करत हसत संथ वाहत होती. याच वेळी कोल्हापूरकरांनी अख्ख्या महाराष्ट्राला एक नवीन शिकवण दिली. नागरिक-प्रशासन एकत्र आल्यास काय होऊ शकते, याचे एक उत्तम उदाहरण इथल्या घरगुती गणेशमूर्ती विसर्जनाने घालून दिले; मात्र दुसरीकडे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काहीसे निर्बंध हटवल्याने तरुणाईच्या आनंदाला उधाण आले आणि मोठ्या प्रमाणात साऊंड सिस्टीम वाजली. परिणामकारक लेझर किरणांमध्ये तरुणाई न्हाऊन निघाली. कोरोना संसर्गानंतर यंदा पहिल्यांदाच निर्बंधमुक्त गणेशोत्सव साजरा होत आहे; मात्र ज्यांनी ही सुंदर सृष्टी निर्माण केली, त्या सृष्टीचे रक्षण करणे ही आपली जबाबदारी आहे, म्हणत कोल्हापूरकर मात्र गेल्या दोन-तीन वर्षांपासून पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करत आहेत. यासाठी जिल्हा प्रशासन, महापलिका, जिल्हा परिषद, पर्यावरणप्रेमी, स्वयंसेवी संस्था एकवटले आहेत. पंचगंगा प्रदूषणमुक्त करण्यासाठी जिल्ह्यात अनेक आंदोलने, चळवळ सुरू आहेत. या पार्श्वभूमीवर सार्वजनिक तरुण मंडळांनी दिलेला सकारात्मक प्रतिसाद हा जिल्हाच नव्हे, तर राज्यासमोर एक आदर्श ठरेल. आता गाव करील ते राव काय करील, या म्हणीनुसार कोल्हापूरकरांनी आवाजाबाबतही निर्णय घेणे आवश्यक आहे.

सीपीआर, जिल्हाधिकारी, सत्र न्यायालय, शिवाजी विद्यापीठ या शांतता क्षेत्रामध्ये गतवर्षीच्या तुलनेत मोठ्या प्रमाणात ध्वनी प्रदूषण झाले. या ठिकाणी आवाजाची मर्यादा ४० डेसिबल इतकी असताना याठिकाणी सरासरी ६६ डेसिबल इतका आवाज धडाडला. इतकेच नव्हे, तर ज्या ठिकाणी आवाजाची मर्यादा अधिक होती त्याठिकाणी तर बेलगाम तरुणाई थिरकल्याने आवाजावर नियंत्रण करणे अधिकच कठीण झाले. याहीपेक्षा बिनखांबी गणेश मंदिर, मिरजकर तिकटी, पापाची तिकटी, गुजरी, गंगावेस, रंकाळा टॉवर, संभाजीनगर, देवकर पाणंद याठिकाणी तर सर्वाधिक आवाजाची नोंद झाली आहे.

### पोलीस प्रशासन, जिल्हाधिकाऱ्यांचे अभिनंदन

पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा व्हावा यासाठी प्रयत्न करत असताना जिल्हाधिकाऱ्यांनी न्यायालयाचे आदेश दाखवत प्लास्टर ऑफ पॅरिसचे आणि त्यावरील केमिकलयुक्त रंगाचे दुष्परिणाम सांगत गणेशमूर्तींचे पंचगंगा नदीत विसर्जन करण्यास बंदी घातली. त्यानंतर राजकीय दबाव आला; मात्र तोही झुगारून प्रशासनाने आपले काम चोख बजावले. पोलिसांनी चोवीस तास रस्त्यावर उभे राहून तरुणाईला योग्य मार्गावरून मार्गस्थ केले. यामुळे पोलीस प्रशासन आणि जिल्हाधिकाऱ्यांचे अभिनंदनच.

### शिवाजी विद्यापीठाचे निरीक्षण (आवाज डेसिबलमध्ये)

| ठिकाण | प्रत्यक्षात आवाज | आवाज मर्यादा |
|---|---|---|
| सीपीआर | ७०.१० | ४० |
| न्यायालय | ७२.०० | ४० |
| शिवाजी पेठ | ७०.११ | ४५ |
| मंगळवार पेठ | ७८.३० | ४५ |
| उत्तरेश्वर पेठ | ७६.०० | ४५ |
| मिरजकर तिकटी | ८०.४६ | ५५ |
| बिनखांबी ग. मंदिर | ८१.५२ | ५५ |
| महाद्वार रोड | ८२.१५ | ५५ |
| पापाची तिकटी | ८५.५० | ५५ |
| गंगावेस | ८२.३० | ५५ |

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

11 SEP 2022
सकाळ

# कानठळ्या!

## ध्वनिमर्यादा ओलांडली; पोलिसांच्या कारवाईकडे लक्ष

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १० : अनंत चतुर्दशीच्या गणेश विसर्जन मिरवणुकीत मोठ्या प्रमाणात ध्वनिप्रदूषण झाले. शांतता क्षेत्र, औद्योगिक, व्यावसायिक आणि रहिवासी क्षेत्रात सर्वत्रच ध्वनी मर्यादेचे उल्लंघन झाल्याचे दिसून आले. शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र विभागाच्या प्राध्यापक, विद्यार्थ्यांनी शहरातील २२ ठिकाणी शुक्रवारी (ता. ९) रात्री १० ते सकाळी ६ वाजेपर्यंत केलेल्या ध्वनी चाचणीच्या अहवालातून ही माहिती पुढे आली आहे.

एरवी रात्री १० नंतर, तर उत्सव काळात रात्री १२ नंतर ध्वनिक्षेपक बंद ठेवावेत, असे आदेश सर्वोच्च न्यायालयाने एका निकालातून दिले आहेत. त्यानुसार गणेश विसर्जन मिरवणुकीत रात्री ध्वनिक्षेपक बंद ठेवण्यात आले. त्यानंतरही सर्वच ठिकाणी ध्वनीच्या मर्यादेचे उल्लंघन झाल्याचे दिसून आले. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने विविध ठिकाणी ध्वनीची मर्यादा किती असावी, याचे निर्देश दिले आहेत. या निर्देशानुसार शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र विभागाने सर्वेक्षण केले व त्याचा अहवाल प्रसिद्ध केला.



सर्वच ठिकाणी ध्वनी मर्यादेचे उल्लंघन झाल्याचे यामध्ये दिसून आले आहे. म्युझिक सिस्टीमच्या कर्णकर्कश आवाजामुळे रहिवासी आणि शांतता क्षेत्रात ध्वनी मर्यादेपेक्षा कितीतरी पटीने जास्त ध्वनीचे प्रमाण होते. ध्वनी मर्यादेचे उल्लंघन करणाऱ्यांवर गुन्हे दाखल होणार का, याकडे आता सर्वांचे लक्ष आहे. हे सर्वेक्षण पर्यावरणशास्त्र विभागाच्या प्रमुख डॉ. असावरी जाधव, माजी विभागप्रमुख प्रा. डॉ. पी. डी. राऊत, संशोधक विद्यार्थी चेतन भोसले, हर्शद माळवेकर, मुकुंद सुतार यांनी केले.

### क्षेत्र : व्यावसायिक

रात्री ध्वनी मर्यादा (५५ डे.सी.)

| परिसर | ध्वनीचे प्रमाण |
|---|---|
| लक्ष्मीपुरी | ७४.१० |
| बिंदू चौक | ७४.९० |
| मिरजकर तिकटी | ८०.१६ |
| बिनखांबी | ८१.५२ |
| महाद्वार रोड | ८२.१५ |
| गुजरी | ७९.०० |
| पापाची तिकटी | ८५.५० |
| गंगावेस | ८२.३० |
| शाहूपुरी | ६७.८० |
| राजारामपुरी ६ वी गल्ली | ७०.०० |

### क्षेत्र : रहिवासी

रात्री ध्वनी मर्यादा (४५ डे.सी.)

| परिसर | ध्वनीचे प्रमाण |
|---|---|
| शिवाजी पेठ | ७०.११ |
| मंगळवार पेठ | ७८.३० |
| उत्तरेश्वर पेठ | ७६.०० |
| राजारामपुरी ५ वी गल्ली | ६४.२० |
| नागाळा पार्क | ५४.५० |
| ताराबाई पार्क | ५६.१० |

### क्षेत्र : शांतता

रात्री ध्वनी मर्यादा (४० डे.सी.)

| परिसर | ध्वनीचे प्रमाण |
|---|---|
| सीपीआर | ७०.१० |
| जिल्हाधिकारी कार्यालय | ६८.५० |
| न्यायालय | ७२.०० |
| शिवाजी विद्यापीठ | ५०.६० |

**“ गणेश विसर्जन मिरवणुकीच्या रात्री सर्वच ठिकाणी आवाजाच्या मर्यादेचे उल्लंघन झाले आहे. रात्री १२ नंतर जरी म्युझिक सिस्टीम बंद झाल्या असल्या तरी मिरवणुकीतील नागरिकांचा गोंगाट, पारंपरिक वाद्ये आणि फटाके यामुळे आवाजाच्या मर्यादेचे उल्लंघन होऊन ध्वनिप्रदूषण झाले.**

**- डॉ. आसावरी जाधव,**
पर्यावरणशास्त्र विभागप्रमुख